नागपूर शहरात दि.२२ सप्टेबर, २०२३ रोजी अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या मुलभूत सुविधा पूर्वस्थितीत आणण्याकरिता येणाऱ्या खर्चासाठी विशेष आर्थिक पॅकेज अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत ...

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०२३/प्र.क्र.२२७/म-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०२४.

वाचा : १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२३/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७ मार्च, २०२३
२) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.मशा-७(५)/नै.आ.व्य./कावि-३८२/२०२३, दि.२० ऑक्टोबर, २०२३
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग समक्रमांक दि.३० नोव्हेंबर, २०२३
४) आयुक्त तथा प्रशासक नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे पत्र क्र.४५८/SE/PWD, दि.२४.०१.२०२४

प्रस्तावना:-

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास मान्य बाबींकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. यासाठी शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि.२७ मार्च, २०२३ अन्वये राज्य आपत्तीचे निकष व दर विहित करण्यात आले आहेत.

नागपूर शहरात माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे रस्ते, घरे व इतर मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीकरिता मदत देण्यासाठी निधी मागणी प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर यांनी शासनास सादर केला होता. त्यानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दराने दि.३० नोव्हेंबर, २०२३ च्या शासन निर्णयाव्दारे याकरिता रु.८३८.५४ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नागपूर शहरात दि.२२ सप्टेंबर, २०२३ रोजी अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या मुलभूत सुविधा पूर्वस्थितीत आणण्याकरिता येणाऱ्या खर्चासाठी विशेष आर्थिक पॅकेज अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:

विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नागपूर शहरात दि.२२ सप्टेंबर, २०२३ रोजी अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या मुलभूत सुविधा पूर्वस्थितीत आणण्याकरिता येणाऱ्या खर्चासाठी विशेष आर्थिक पॅकेज अंतर्गत खालील प्रमाणे रु.२०४,७१,६२,००० (अक्षरी रुपये दोनशे चार कोटी एकाहत्तर लक्ष बासष्ट हजार फक्त) इतक्या खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | कामाची व्याप्ती | मंजूर निधी (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | क्षतीग्रस्त नदी, नाल्याच्या भिंतीचे बांधकाम | ८.४१ कि.मी. | १६३२३.३१ |
| २ | क्षतीग्रस्त रस्त्यांची दुरुस्ती | ६१.३८कि.मी. | ४१४८.३१ |
| | एकूण | | २०४७१.६२ |

२. नागपूर शहरातील क्षतिग्रस्त झालेल्या मुलभूत सुविधा पूर्वस्थितीत आणण्याकरिता आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी तांत्रिक मान्यता व इतर आवश्यक अटी व शर्तींची पूर्तता केल्याची खात्री



Scanned with OKEN Scanner

करुन विहित निविदा प्रक्रीया राबवावी. त्यानंतर प्राप्त देयकांच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार निधीची मागणी जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे करावी. तसेच या विशेष आर्थिक पॅकेज अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. या खर्चासाठी राज्य शासनाच्या सर्व नियमांचे तसेच अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

३. वरील प्रयोजनासाठी "मागणी क्र.सी-६, प्रधान लेखाशीर्ष २२४५ , नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय- ०२ पुर- चक्रीवादळे इत्यादी -१०१, अनुग्रह सहाय्य - (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानका व्यतिरिक्त खर्च - (९२) (१३) नैसर्गिक आपत्तीमुळे अनुज्ञेय विभागातील आपत्तीग्रस्त पायाभूत सुविधांच्या तातडीच्या स्वरुपाच्या दुरुस्ती/पुर्नस्थापनेसाठी खर्च (अनिवार्य) - ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२४५ २३१८)" या लेखाशिर्षाखाली चालू वर्षी उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या निधीमधून खर्च करण्यात यावा.

४. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५४/२०२४/व्यय-९, दि.०५.०२.२०२४ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२४०२२२११५३४४०८१९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(संजय औ. धारूरकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उपमुख्यमंत्री (गृह/ वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन,मुंबई
४. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
६. अपर मुख्य सचिव (वित्त) /प्रधान सचिव (नगर विकास-२), मंत्रालय, मुंबई.
७. विभागीय आयुक्त, नागपूर
८. जिल्हाधिकारी,नागपूर
९. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
११. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
१२. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१३. वित्तिय सल्लागार व सहसचिव, मदत व पुनर्वसन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१५. कार्यासन अधिकारी (व-१/म-११/आव्यप्र-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती (कार्यासन/ म-३)

C:\Subhash\R&R\M-३\जून ते ऑक्टोबर, २०२३\G.R. २२७-२०२३ पायाभूत सुविधा नुकसान नागपूर.docx

Scanned with OKEN Scanner